प्रबोधन
गोरेगाव

# तेविसावा वार्षिक अहवाल

१९९५ - ९६

# प्रबोधन, गोरेगाव

## २३ वा वार्षिक अहवाल

## १९९५-९६

'प्रबोधन-गोरेगाव' च्या दि. १ एप्रिल १९९५ ते ३१ मार्च १९९६ या कालावधीतील कार्याचा ताळेबंद व हिशोबपत्रके संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना सादर करतांना कार्यकारी मंडळास अतिशय आनंद होत आहे.

या अहवाल वर्षात संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या एकूण सभा घेण्यात आल्या व त्या सभांना स्वीकृत सभासदांसह कार्यकारी मंडळाच्या सभासदांची उपस्थिती संख्या एवढी होती.

**जाणता राजा :**

छत्रपती शिवाजी महाराज हे अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत; त्यांच्या नुसत्या दर्शनाने व आठवणीने सुद्धा महाराष्ट्रीय लोकांच्या हृदयात स्वाभिमानायुक्त आदर धगधगतो. त्या महान् राष्ट्रपुरुषाचे रोमहर्षक चरित्र संपूर्ण हिंदुस्थानालाच नव्हे तर संपूर्ण जगाला अत्यंत प्रभावीपणाने नाट्यमयरूपात सांगावे, म्हणून आयुष्यभर छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्राचा ध्यास घेतलेले श्रीमान् बाबासाहेब पुरंदरे यांनी 'जाणता राजा' हे अत्यंत प्रभावी नाट्य निर्माण केले. या महानाट्याचे प्रयोग प्रबोधनच्या अत्यंत महत्वाकांक्षी अशा 'प्रोजेक्ट २०००' या प्रकल्पाच्या निधी उभारणीसाठी करण्याचे ठरले. हा दुग्धशर्करा योग जुळून आला.

'प्रबोधन'चे संस्थापक, 'जाणता राजा' चे व 'प्रोजेक्ट-२०००' या प्रकल्पाचे संयोजक माननीय शिवसेना नेते श्री. सुभाष देसाई यांच्या कल्पक उमद्या व धडाडीच्या नेतृत्वाखाली 'प्रबोधन'ने 'जाणता राजा' या अत्यंत प्रभावशाली नाट्याचे आयोजन करण्याचे ठरविले व दि. १ एप्रिल १९९५ रोजी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर प्रबोधन क्रीडाभवनावर, 'व्हिडीओकॉन' या कंपनीचे पणन् व्यवस्थापक श्री. पणशीकर यांच्या शुभहस्ते 'जाणता राजा' च्या तिकिट विक्रीस शुभारंभ करण्यात आला.

'जाणता राजा' नाट्याचा उद्घाटन सोहळा दि. १९मे १९९५ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांच्या शुभहस्ते साजरा करण्यात आला. दि. १९मे १९९५ ते २८मे १९९५ या कालावधीत महाराष्ट्र राज्य मंत्री मंडळातील श्री. लिलाधर डाके, श्री. गजानन कीर्तिकर या सन्माननीय मंत्र्यांनी तर महाराष्ट्र राज्य विधानसभेचे अध्यक्ष श्री. दत्ताजी नलावडे, ठाण्याचे श्री. आनंद दिघे, पुण्याचे महापौर श्री. माऊली शिरवळकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

'जाणता राजा' या छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या रोमहर्षक जीवनावर आधारित ऐतिहासिक नाट्यासाठी प्रबोधन क्रीडाभवनावर २०० फूट लांबीचे, ५० फूट रुंद व ५० फूट उंचीचे भव्य व्यासपीठ उभारण्यात आले होते.

या महान् नाट्यात एकंदर ३५० कलावंत त्याचप्रमाणे हत्ती, घोडे, बैलगाड्या यांचाही अत्यंत कलात्मक दृष्टीने नाट्यास पोषक असा वापर करण्यात आला होता. १९मे ते २८मे १९९५ या कालावधीत मुंबईतील लक्षावधी लोकांनी हे नाट्य पाहिले व त्या नाट्याच्या योजनाबद्ध व सुनियंत्रित आखणी व सादरीकरणाबद्दल 'प्रबोधन'ची प्रशंसा केली हे या ठिकाणी नमूद करण्यास आम्हास अत्यानंद होत आहे.

**माननीय श्री. चंद्रकांतजी खैरे व श्री. सदाशिवराव देशमुख यांची क्रीडाभवनास भेट :**

महाराष्ट्र राज्याचे माननीय गृहनिर्माण मंत्री श्री. चंद्रकांत खैरे यांनी प्रबोधन क्रीडाभवनास दि. २७ ऑगस्ट १९९५ रोजी आवर्जून भेट दिली व क्रीडाभवनात सुरु असलेल्या विविध उपक्रमांची माहिती करून घेतली व प्रबोधनच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. माननीय मंत्र्यांच्या भेटीच्या वेळी त्यांनी गोरेगावात असलेल्या अनेक क्रीडांगणांची माहिती करून घेतली व त्या क्रीडांगणांच्या विकासासाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याचे मान्य केले. माननीय मंत्र्यांच्या भेटीच्या वेळेस गोरेगावातील अनेक क्रीडाप्रेमी संस्थांचे सदस्य व क्रीडाप्रेमी नागरिक उपस्थित होते व त्याप्रसंगी माननीय मंत्र्यांचा घरगुती वातावरणात अत्यंत हृद्य सत्कार माननीय शिवसेना नेते व प्रबोधनचे संस्थापक श्री. सुभाष देसाई यांच्या हस्ते करण्यात आला.

मराठी माणसाने आपल्या कर्तृत्वाने अनेक क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. परंतु इंग्लंड सारख्या परदेशातही आपल्या स्वकर्तृत्वाने लंडन कौंटीचे महापौरपद भूषविणारे श्री. सदाशिवराव देशमुख यांच्यासारख्या मराठी माणसाकडे पाहून मराठी माणसांना अप्रूप तर वाटतेच पण अभिमानही वाटतो. श्री. सदाशिवराव देशमुख यांनी आपल्या मुंबई भेटीच्या वेळीस दि. २७ ऑगस्ट १९९५ रोजी प्रबोधन क्रीडाभवनास आवर्जून भेट दिली व 'प्रबोधन' च्या सर्व पदाधिकाऱ्यांचे व कार्यकर्त्यांचे कौतुक केले. श्री. सदाशिवरावांच्या क्रीडाभवनाच्या भेटीच्या प्रसंगी, गोरेगावातील अनेक नामवंत व मान्यवर नागरिकांच्या उपस्थितीत, त्यांचा श्री. सुभाष देसाई यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी बोलताना श्री. सदाशिवराव देशमुख यांनी प्रबोधनच्या 'प्रोजेक्ट २०००' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी सर्वतोपरी साहाय्य व मदत देण्याचे आश्वासन दिले.

**प्रबोधन वक्तृत्व स्पर्धा वर्ष २३ वे :-**

दूरदर्शनवरील अनेकविध वाहिन्यांच्या धडाकेबाज कार्यक्रमांच्या आक्रमणाने आपल्या समाज जीवनाची हानी झाली आहे का समाज जीवनाचा स्तर उंचावला आहे, हा वादविवादाचा मुद्दा असला तरी, एक गोष्ट मात्र निश्चितपणे जाणवते ती म्हणजे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक व सामाजिक विषयांचे कमी झालेले आकर्षण. त्याचाच परिणाम म्हणून प्रबोधनच्या स्थापनेपासून सातत्याने दरवर्षी होणाऱ्या या वक्तृत्व स्पर्धेस लाभणारा विद्यार्थ्यांचा अनुत्साही प्रतिसाद. यंदाच्या

**उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रके :**

कुमारी शल्मली पितळे, जी.व्ही. खाडे हायस्कूल, शहापूर. कुमार अजित जोशी, पार्ले टिळक विद्यालय, बिलेपार्ले, मुंबई

**घोषित विषयांवरील स्पर्धा :**

**प्रथम पारितोषिक** (रोख रु. ७५०/-)

कुमार सुशांत प्रकाश बर्वे, पार्ले टिळक विद्यालय, विलेपार्ले, मुंबई

**द्वितीय पारितोषिक** (रोख रु. ५००/-)

कुमारी ललिता रमेश पानसे, नंदादीप विद्यालय, मुंबई

**तृतीय पारितोषिक** (रोख रु. २५०/-)

कुमारी विपुला व्यंकटेश कामत, अरविंद गंडभीर हायस्कूल, मुंबई

**उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रके :**

कुमार प्रसन्न पोंगम, अ.भि.गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव, मुंबई

कुमार श्रद्धा वामन कार्लेकर, आदर्श विद्यालय, गोरेगाव, मुंबई

कुमारी पुनिता भडसावळे, सरस्वती सेकंडरी स्कूल, ठाणे

**१८वा प्रबोधन आंतरशालेय क्रीडामहोत्सव :**

दरवर्षी आयोजित करण्यात येणारा प्रबोधनचा आंतरशालेय क्रीडामहोत्सव म्हणजे वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरातील शालेय विद्यार्थ्यांना आपल्या अंगचे क्रीडा नैपुण्य दाखविण्याची अपूर्व अशी पर्वणीच. या क्रीडामहोत्सवात आपण आपले क्रीडानैपुण्य दाखविल्यास राज्य पातळीवर होणाऱ्या विविध क्रीडास्पर्धांमध्ये आपणांस सामील होण्यास वाव मिळू शकतो; व 'प्रबोधन'तर्फे आयोजित करण्यात येणारा हा क्रीडामहोत्सव म्हणजे राज्य किंवा राष्ट्र पातळीवरील होणाऱ्या क्रीडास्पर्धांचे प्रवेशद्वारच आहे, याची अत्यंत सुस्पष्ट जाणीव झाल्यानेच या क्रीडामहोत्सवास दरवर्षी वाढता प्रतिसाद लाभत आहे. यंदाच्या वर्षीचा हा क्रीडामहोत्सव दि. ११ डिसेंबर १९९५ ते १७ डिसेंबर १९९५ या कालावधीत 'प्रबोधन क्रीडाभवन' सिद्धार्थ नगर, गोरेगाव या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता व त्या क्रीडामहोत्सवास वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरातील ९५ शाळांतील सुमारे ६०० हून अधिक स्पर्धकांचा सहभाग लाभला होता. 'प्रबोधन' च्या 'प्रोजेक्ट २०००' या प्रकल्पातील खेळाडूंनी या क्रीडामहोत्सवात आपल्या क्रीडानैपुण्याची विशेष झलक दाखविल्याचे आढळून आले. स्पर्धेत पदक जिंकावयाचेच अशा ईर्षेने क्रीडाक्षेत्रातील अनेक मान्यवर, शालेय विद्यार्थी / विद्यार्थिनी, शिक्षक यांच्या उपस्थितीने या क्रीडामहोत्सवास खरेखुरे महोत्सवी स्वरूप प्राप्त झाले. यावर्षी देखील हा क्रीडामहोत्सव अत्यंत हर्षोत्फुल्ल वातावरणात पार पडला. या क्रीडामहोत्सवास स्टेट बँक ऑफ इंडिया, थम्स् अप् व भारतीय आयुर्विमा महामंडळ आदि मान्यवरांचा पुरस्कार लाभला होता.

या १८व्या आंतरशालेय क्रीडामहोत्सवाचा उद्घाटन सोहळा मुंबईचे नगरपाल

विद्यालय व कुमारी नम्रता प्रकाश सामंत, सन्मित्र मंडळ या विद्यार्थीनींना देण्यात आले, त्या दोघींना प्रत्येकी ९१% गुण मिळाले. इतर गुणवंत विद्यार्थी/विद्यार्थीनी खालीलप्रमाणे :-

**मराठी :** (श्री. वसंत तावडे, यांजकडून रोख रु.५०/-)

कुमारी माधवी विष्णू केळजी, नंदादीप विद्यालय ८७/१००

**इंग्रजी :** (श्री. सुभाष देसाई यांचेकडून रोख रु.५०/-)

कुमारी विशाखा प्रमोद देवधर, नंदादीप विद्यालय, ८८/१००

कुमार गौरव प्रेमानंद गवाणकर, सन्मित्र मंडळ, ८८/१००

**हिंदी :** (श्री. जयंतराव गुप्ते यांजकडून रोख रु.५०/-)

कुमार आशिष मिलेश कार्ले, नंदादीप विद्यालय ७७/१००.

**गणित :** (श्री. महादेव खानोलकर व डॉ. मनोहर अदवानकर यांजकडून रोख रु. ५०/- प्रत्येकी)

कुमार प्रदिप पांडुरंग पोटले व कुमारी चैताली रत्नाकर महाजन, कुलदीप सिंग दिवाण हायस्कूल - १४७/१५०

**समाजशास्त्र :** (श्री. कृष्णकांत जोशी व श्रीमती गीता सामंत यांजकडून रोख रु. ५०/- प्रत्येकी)

कुमारी सुशांता वामन देसाई,
अ. भि. गोरेगावकर हायस्कूल ९७/१००

कुमारी सुरुची अरूण सराफ,
अ. भि. गोरेगावकर हायस्कूल ९७/१००

कुमार मिलिंद प्रभाकर पेंडबाजे,
अ. भि. गोरेगावकर हायस्कूल ९७/१००

कुमार सुजीत व्ही. परब,
आदर्श विद्यालय ९७/१००

**संस्कृत :** (डॉ. मनोहर अदवानकर यांजकडून रोख रु.५०/-)

कुमार गौरव प्रेमानंद गवाणकर, सन्मित्र मंडळ हायस्कूल ९७/१००

**शास्त्र :** (श्री. पद्माकर देसाई व श्री. नरसिंह पाटील यांजकडून प्रत्येकी रोख रु. ५०/-)

कुमारी नम्रता प्रकाश सामंत, सन्मित्र मंडळ हायस्कूल १४७/१५०.

**विशेष आभार :**

१९७२ साली समाजकार्य करण्याचा निश्चित विचार घेऊन सामाजिक कार्याच्या जाणिवेने भारावलेल्या युवकांनी 'प्रबोधन' ची स्थापना केली. समाजात दुर्लक्षित राहिलेल्या अनेक गोष्टींकडे लक्ष देऊन भव्य दिव्य कार्य करण्याची जिद्द बाळगून संस्थेने येथवर धडाकेबाज मजल मारली. सतत कार्यरत राहण्याची शपथ घेतलेले व संस्थेच्या कार्यासाठी तन-मन-धनाने कार्य करणारे कार्यकर्ते हे तर 'प्रबोधन'चे हे बलस्थान कायमच राहिले आहे, ही कौतुकास्पद बाब आम्ही येथे आवर्जून नमूद करीत आहोत. देणगीदार, सक्रीय कार्यकर्ते व सदस्य यांच्या पाठबळावरच संस्थेने आजवर वाटचाल केली व त्या पाठबळावर आणि सतत वृद्धिंगत होत गेलेला अनेक मान्यवर व्यक्तिंचा व संस्थांचा स्नेह या ऋणानुबंधांचा संस्थेस विसर पडणे अशक्यच आहे. त्या सर्वांची संस्था अत्यंत ऋणी आहे. त्या सर्वांचा या ठिकाणी नावानिशी उल्लेख करणे अशक्यच आहे. या सर्वांचे प्रेम, स्नेह व ऋणानुबंध सतत वृद्धिंगत होत राहो, हीच सदिच्छा.

**कार्यकारी मंडळ**
**प्रबोधन गोरेगाव**

(एच) एका वर्षापेक्षा अधिक काळ कोणतेही देणे संस्थेने बाकी ठेवलेले नाही. कोणतीही रक्कम बुडीत मानलेली नाही.

(आय) रु. ५०००/- पेक्षा अधिक किंमतीचा बांधकाम खर्च किंवा दुरुस्ती खर्च करण्यात आलेला नाही.

(जे) धर्मादाय संस्थेची कोणतीही रक्कम कलम ३५ च्या विरोधात गुंतविण्यात आलेली नाही.

(के) स्थावर मालमत्तेचा कोणताही विनियोग कलम ३६ च्या विरोधात केलेला आम्हास आढळला नाही.

(एल) नियमबाह्य, बेकायदेशीर व अयोग्य खर्च किंवा संस्थेस येणे असलेली रक्कम वा अन्य मालमत्ता जमा करण्यामध्ये अपयश वा नकार संस्थेच्या बाबतीत आढळला नाही. त्याचप्रमाणे निधीचा अपव्यय किंवा नुकसान संस्थेने केलेले नाही.

(एम) अंदाजपत्रक नियम १६-अ प्रमाणे दर्शविलेल्या नमुन्यात सादर केलेले नाही.

(एन) कार्यकारिणी सदस्यांची लघुत्तम व महत्तम संख्येची तरतूद पाळण्यात आली आहे.

(ओ) नियमानुसार नियमितपणे सभा घेण्यात आल्या आहेत.

(पी) सभांची इतिवृत्ते लिहिण्यात आली आहेत.

(क्यू) कार्यकारिणी सदस्यांपैकी कोणाचाही संस्थेच्या गुंतवणुकीशी संबंध नाही.

(आर) कोणीही कार्यकारिणी सदस्य संस्थेचा धनको वा ऋणको नाही.

(एस) मागील वर्षीच्या कागदपत्रामध्ये आम्ही कोणतीही नियमबाह्यता दर्शविली नव्हती.

(टी) धर्मादाय उपायुक्तांचे किंवा धर्मादाय सहआयुक्तांचे लक्ष वेधण्यासारखी कोणतीही विशिष्ट बाब आहे असे आम्हास वाटत नाही.

मुंबई
दि. २९ नोव्हेंबर १९९६

सही
(सनदी लेखापाल)

# प्रबोधन गोरेगाव

*कार्यालय :* प्रबोधन क्रीडाभवन, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४
दूरध्वनी : ८७३ ४८ ६९

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदलेली संस्था [Regn. No. Bom. 46/72 GB BSD] मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदलेली संस्था [Regn No. F 2502 Bom.]

१९९५ - ९६

अध्यक्ष : श्री. विलास देवरुखकर बी.एससी. (ऑ.)
उपाध्यक्ष : श्री. बसंत तावडे बी.ए.
श्री. पद्माकर देसाई बी. एससी. (ऑ.)

कार्यकारी मंडळ

कार्याध्यक्ष : श्री. गिरीश देसाई डी.सी.ई.
प्रमुख कार्यवाह : डॉ. मनोहर अदवानकर एम्.एससी. पीएच्.डी.
सहकार्यवह : श्री. श्रीनिवास शिरसेकर जी.डी. आर्ट
: श्री. नितीन शिंदे बी.ए. डी.जे.
खजिनदार : श्री. महादेव खानोलकर

सभासद

श्री. दिनकर मालवणकर
श्री. चंद्रकांत पोतदार
श्री. मिलींद डुंबरे बी.कॉम्.
श्री. समीर त्रैलोक्य बी.एससी.
श्री. भूषण काळे
श्री. राधाकृष्ण भट
ॲड्. विकास रेळे बी.ए.,एल्एल.बी.
श्री. चंद्रकांत देऊलकर
श्री. पांडुरंग पोखरकर बी.एससी.
श्री. सुरेश चव्हाण बी.ए.
श्री. सुधीर मिठबावकर बी.एससी.,बी.एड्.
श्री. सुनिल कविश्वर
श्री. मॅथ्यु चॅको (स्विकृत)

अंतर्गत हिशेब तपासनीस
श्री. रवींद्र नाखरे बी.कॉम्. डी.एफ्.एम्.

सनदी लेखापाल
मे. एस्. एस्. नायक आणि कं.